REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 10 | JULY - 2022

# ‘‘ महाराष्ट्राचा औद्योगिक विकास एक अभ्यास‘‘

**Ms. Komal Ashok Gupta[1] and Dr. Ronil K. Ahale[2]**
[1]Ph.D. Research Student
[2] Supervisor, Department of Commerce, Dr. H. N. Sinha Arts & Commerce , College, Patur (Dist. – Akola).

**गोषवारा** :–



महाराष्ट्र औद्योगिक विकासामध्ये संपूर्ण भारतात अग्रेसर राज्य आहे. जागतिक स्तराच्या पायाभूत सुविधांसह आकर्षक औद्योगिक धोरणे आणि व्यवसाय करण्याचे सुलभीकरण यामुळे राज्यात अनेक जागतिक ब्रँड स्थिरावले आहेत. राज्य औद्योगिक अभूतपूर्व तांत्रिक प्रगतीचा साक्षीदार आहे त्यामुळेए राज्य विविध क्षेत्रात नवीन नविन्यपूर्ण उपक्रम आणि स्टार्टअप आकर्षित करीत आहे. यात उद्योग ४.० आणि माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा यांचाही समावेश आहे. महाराष्ट्र देशातील ऑटोमोबाईल्स उत्पादनाची मुख्य केंद्र आहे. कृषी आणि अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये देखील राज्य आघाडीवर आहे राज्यातून सर्वाधिक निर्यात होते असल्यामुळे ते गुंतवणूकदाराचे सर्वाधिक पसंतीचे ठिकाण ठरले आहे देशात प्रमुख सुधारणाची सातत्याने अंमलबजावणी होत असल्यामुळे व ती वाढीस समर्थन मिळाल्याने भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होत आहे. महाराष्ट्र राज्याचे देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये अग्रेसर स्थान व मॅग्नेटीक महाराष्ट्र ब्रॅण्ड चे बळकटीकरण सोबतच प्रगतशील प्रतिमा औद्योगिक वाढ आणि शाश्वत विकासावर लक्ष केंद्रित केल्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेची प्रमुख योगदान देणारे राज्य आहे

## प्रस्तावना :

राज्याच्या पूरक औद्योगिक धोरणामुळे अनेक प्रख्यात औद्योगिक घटक राज्यात आले आहेत. महाराष्ट्राच्या आर्थिक सर्वेक्षणानुसार सन २०१७-१८ मध्ये उत्पादन क्षेत्रातील वाढीचा दर हा ७.६ टक्के एवढा

अपेक्षित आहे. राज्यांमध्ये विविध उद्योगांसाठी अनुकूल वातावरण आहे. उदा. वाहन उद्योग ( पुणे व औरंगाबाद विभाग ), इलेक्ट्रॉनिक प्रणाली सारलेखन उद्योग (पुणे विभाग), औषध उद्योग व रासायनिक उद्योग (मुंबई ठाणे औरंगाबाद व पुणे विभाग), अभियांत्रिका (अहमदनगर नाशिक पुणे व औरंगाबाद विभाग), ग्राहकोपयोगी वस्तू (पुणे विभाग), वस्त्रोद्योग (सोलापूर व नागपूर-अमरावती विभाग), अन्नप्रक्रिया (सोलापूर, अहमदनगर-नाशिक, नागपूर-अमरावती विभाग), लॉजिस्टिक्स (मुंबई-ठाणे विभाग व नागपूर-अमरावती विभाग), सिमेंट आणि स्टील उद्योग (विदर्भ-मराठवाडा विभाग), माहिती तंत्रज्ञान व त्यावर आधारित उद्योग (मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर अमरावती विभाग) यांच्या या संदर्भात प्रामुख्याने उल्लेख करता येईल. सन २०१४ ते २०१८ या कालावधीमध्ये राज्यात ११९ खाजगी आणि तंत्रज्ञान उद्योगांमधून समोर १९२.६० कोटी गुंतवणूक झाली असून त्यातून ५,५०,००० इतकी रोजगार निर्मिती झाली आहे.

## संशोधनाचे उद्देश :

1) महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणे
2) महाराष्ट्रतील सुक्ष्म,लघु,मध्यम उद्योगांचा अभ्यास करणे
3) महाराष्ट्रातील औद्योगिक परिस्थीतीचा अभ्यास करणे

## महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास

सन १९७०नंतरच्या दशकातील योग्य आर्थिक धोरणांमुळे महाराष्ट्र राज्य भारताच्या अग्रगण्य औद्योगिक राज्य बनले. आर्थिक क्षेत्रात पहिला क्रमांक मिळविण्याच्या प्रयत्न करणाऱ्या आणि प्रगतिशील, पुरोगामी अशा राज्यांपैकी ते एक आहे. परंतु महाराष्ट्रात विकास सारख्या प्रमाणात होऊ शकला नाही. मुंबईसह पश्चिम महाराष्ट्राचा विकास झाला पण विदर्भ, मराठवाडा व कोकण हे भाग मागास राहिले. महाराष्ट्रातील राजकारणात व नोकरशाहीतही पश्चिम महाराष्ट्राचा अधिक प्रभाव आहे[संदर्भ हवा]. राज्याचे २००४ सालचे वार्षिक उत्पन्न (gross state domestic product) १०६ अब्ज अमेरिकन डॉलर इतके आहे. महाराष्ट्र भारताच्या दुसरे सर्वांत जास्त शहरीकरण झालेले राज्य आहे. एकूण राष्ट्रीय औद्योगिक उत्पन्नापैकी १३% महाराष्ट्राचे योगदान आहे. ६४.१४% लोक कृषी व संबंधित उद्योगात रोजगार मिळवतात. एकूण वार्षिक उत्पन्नापैकी (GSDP) ४६% हिस्सा हा कृषी व संबंधित उद्योगातून मिळतो.

**महाराष्ट्रातील प्रमुख उद्योगधंदे -** रासायनिक आणि संबंधित उत्पादने, विद्युत आणि साधी यंत्रे, कापड, पेट्रोलियम आणि तत्सम उद्योग हे आहेत.

**इतर महत्त्वाचे उद्योगधंदे -** धातू उत्पादने, वाईन (द्राक्षापासून तयार केले जाणारे मद्य), दागिने, औषधे, अभियांत्रिकी सामान, यांत्रिक सामान, पोलाद व लोह उद्योग, प्लास्टिक वायर्स.

**महत्त्वाची पिके-** आंबा, द्राक्षे, केळी, संत्री, गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी आणि कडधान्ये.

**महत्त्वाची नगदी पिके -** शेंगदाणे, कापूस, ऊस, हळकुंड व तंबाखू. माहाराष्ट्रातील सिंचनाखालील जमीन ३३,५०० चौ.कि.मी. इतकी आहे.

**महाराष्ट्रातील सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगाचा अभ्यास :**

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या सर्वागिण विकासासाठी औद्योगिक समूह विकासाची संकल्पना केंद्र शासनाने स्वीकारली आहे. यास अनुसरुन केंद्र शासनाने औद्योगिक समूहांच्या विकासासाठी योजना जाहिर केल्या आहेत. उद्योग संचालनालय, मुंबई द्वारा सदर औद्योगिक समूह विकास योजनांची राज्यात प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी औद्योगिक समूहांच्या विकासासाठी कार्यवाही करणेत येत आहे. केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघु व मध्यम (MSME) मंत्रालयामार्फत सुक्ष्म व लघु उपक्रमासाठी सुधारीत सुक्ष्म, लघु उपक्रम-समुह विकास योजना (MSE-CDP) दिनांक १०/०२/२०१० रोजी घोषित केली आहे. सदर योजनेतुन सुक्ष्म व लघु उपक्रमाच्या सर्वांगीण विकास व वाढीकरीता क्षमतावृध्दी कार्यक्रम अंमलबजावणीसाठी तसेच सामायीक सुविधा निर्मितीसाठी अनुदान देण्यात येते. सामायिक सुविधा केंद्राअंतर्गत (सीएफसी) संशोधन व विकास केंद्र, पॅकेजिंग केंद्र चाचणी तसेच प्रशिक्षण केंद्र, सामाईक जलनिस्सारण केंद्र, सामाईक प्रक्रिया केंद्र इ. बाबीचा समावेश होतो.

**सुधारीत योजनेची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे:**

- सामायिक सुविधा केंद्राची प्रकल्प किंमत मर्यादा रु. १० कोटी वरुन रु. १५ कोटी पर्यंत वाढवलेली आहे. ज्यामध्ये केंद्र शासनाचा सहभाग ७०% ते ९०% इतका राहील.
- पायाभूत सुविधांच्या विकासासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रु. १० कोटी असून ज्यामध्ये केंद्र शासनाचा सहभाग ६०% राहील.
- क्षमतावृध्दी कार्यक्रमासाठीची प्रकल्प किंमत मर्यादा रु.१० लाख इतकी आहे. दिनांक २७.०७.२०१६ रोजीच्या सदर योजनेच्या सुधारीत मार्गदर्शक तत्वांनुसार केंद्र शासनामार्फत निदानोपयोगी अभ्यास अहवाल व क्षमतावृद्धी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी यापुढे केंद्र शासनाचे अनुदान देण्यात येणार नाही. परंतू , प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झाल्यानंतर रू.१०.०० लाख रक्कम विशेष हेतू वाहन संस्थेचे सहभाग वर्गणी म्हणून मान्य करण्यात येईल.
- सामाईक सुविधा केंद्र आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी तयार करावयाच्या विस्तृत प्रकल्प अहवालासाठीची किंमत मर्यादा रु. ५.०० लाखापर्यंत अनुज्ञेय असेल.

**उत्पादन क्षेत्र सुधारणे**

एखाद्या वस्तूचे उत्पादन किंवा उत्पादन, प्रक्रिया किंवा जतन करणारे उपक्रम या श्रेणीमध्ये समाविष्ट आहेत.

- सूक्ष्म उद्योग - वार्षिक उलाढाल रु. ५ कोटींपेक्षा कमी
- लघुउद्योग - वार्षिक उलाढाल रु. ५ कोटी ते ७५ कोटींच्या दरम्यान
- मध्यम उद्योग - वार्षिक उलाढाल रु. ७५ कोटी ते २५० कोटी
- सेवा क्षेत्र सुधारणे
- सूक्ष्म उद्योग - वार्षिक उलाढाल रु. ५ कोटींपेक्षा कमी
- लघुउद्योग - वार्षिक उलाढाल रु. ५ कोटी ते ७५ कोटींच्या दरम्यान

- मध्यम उद्योग - वार्षिक उलाढाल रु. ७५ कोटी ते २५० कोटी

### महाराष्ट्रातील औद्योगिक परिस्थीती :

उदासीकरण्याच्या धोरणापासून (ऑगस्ट १९९१) ऑक्टोबर २०२० पर्यंत राज्यात रु. १४,२९,१४२ कोटी गुंतवणुकीसह २०,९०९ औद्योगिक प्रकल्प मंजूर करण्यात आले. सन २०२० मध्ये ऑक्टोबरपर्यंत रु. ३७,८८७ कोटी प्रस्ताविक गुंतवणुकीचे २४७ प्रकल्पाची नोंदणी झाली.

- एप्रिल २००० ते सप्टेंबर २०२० पर्यंत राज्यातील थेट परदेशी गुंतवणूक रु. ८,१८,५२२ कोटी असून ती देशातील एकूण थेट परदेशी गुंतवणुकीच्या २७.७ टक्के होती. सन २०२०-२१ मध्ये सप्टेंबर पर्यंत राज्यातील थेट परदेशी गुंतवणूक रु. २७,१४३ कोटी होती.
- मार्च २०२० पर्यंत राज्यात एकूण १७.67 लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची "उद्योग आधार" साठी नोंदणी केली असून त्यापैकी १५.६० लाख सूक्ष्म, १.९९ लाख लघु व ०.०८ लाख मध्यम उपक्रम होते या सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची राज्यात एकूण रु. २,३८,५४३ कोटी गुंतवणूक असून त्याद्वारे ९१.०१ लाख रोजगार निर्माण झाला.
- दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गे चा एक भाग म्हणून कामगार चालत जाणे (वॉक-टू-वर्क) या संकल्पनेवर आधारित सुनियोजित यांनी हरित स्मार्ट औद्योगिक शहर म्हणून राज्यातील १०,००० एकर क्षेत्रात वसलेल्या औरंगाबाद औद्योगिक शहराचा (ऑरिक) विकास केला जात आहे. ऑरिकमध्ये सुमारे २१२ एकर क्षेत्रावरील ६२ भूखंडाचे गुंतवणूकदारांना वाटप करण्यात आले आहे. ऑरिकमध्ये रु.५,००० कोटी पेक्षा जास्त गुंतवणूक झाली असून सुमारे २,८११ रोजगार निर्मिती झाली आहे.
- दृष्टिक्षेपात भारत पर्यटन सांखिकी-२०२० अहवालानुसार २०१९ मध्ये राज्यात १४.९३ कोटी देशांतर्गत पर्यटकांनी आणि ०.५५ कोटी विदेशी पर्यटकांनी भेटी दिल्या, तर २०१८ मध्ये ११.९२ कोटी देशांतर्गत पर्यटकांची आणि ०.५१ कोटी विदेशी पर्यटकांची भेट दिल्या.
- राज्यात दि. ३१ मार्च २०२० रोजी सुमारे ५.५६ कोटी सभासद असलेल्या २.13 लाख सहकारी संस्था होत्या. त्यापैकी ९.७ टक्के प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था, ९.८ टक्के बिगर-कृषी पतपुरवठा संस्था, ५२.४ टक्के गृहनिर्माण संस्था, १२.५ टक्के कृषी प्रक्रिया संस्था, ५.१ टक्के मजूर कंत्राटी संस्था आणि १०.५ इतर कार्यात गुंतलेल्या संस्था होत्या.

### निष्कर्ष

महाराष्ट्र आपल्या सुविकसित पायाभूत सुविधा कुशल कामगार वाहतुकीचे चांगले जाळे मोक्याचे भौगोलिक स्थान उद्योगाच्या विविध क्षेत्रासाठी आखलेली धोरणे सर्वोत्तम प्रोत्साहन धोरणे आणि अशा अनेक बाबींमुळे उद्योगांसाठी देशात सर्वाधिक पसंतीचे स्थान आहे. यामुळे देशांतर्गत आणि भारत बाहेरून सर्वाधिक गुंतवणूक आकर्षित करण्यास महाराष्ट्र सक्षम ठरले आहे आणि ते मॅग्नेटीक महाराष्ट्र - अमर्यादित आकर्षणे म्हणून उदयास आले आहे.

## संदर्भ


- महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण-2019
- महाराष्ट्राची अर्थिक पाहणी
- विकिपीडिया
- Msme